जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 2 NOV 2026
सकाळ



कोल्हापूर : 'सकाळ प्रकाशन'तर्फे लेखक डॉ. गणपती कमळकर लिखित 'विश्वश्रेष्ठ शिक्षण देणारे देश आणि भारत' या पुस्तक प्रकाशनप्रसंगी कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी डॉ. सुनीलकुमार लवटे, निखिल पंडितराव, डॉ. कमळकर, डॉ. विश्वनाथ मगदूम, अशोक घुगे, डॉ. वर्षा मैंदर्गी, डॉ. उत्तम पाटील, गीतांजली कमळकर हे उपस्थित होते.

गुणवत्तापूर्ण शिक्षण न दिल्यास देशात बेरोजगारांची त्सुनामी : कुलगुरू डॉ. कामत

'विश्वश्रेष्ठ शिक्षण देणारे देश आणि भारत'चे प्रकाशन

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १ : गुणवत्तापूर्ण शिक्षण न दिल्यास देशात सुशिक्षित बेरोजगारांची त्सुनामी येईल. शिक्षक हाच संपूर्ण शिक्षण व्यवस्थेचा कणा असून, शिक्षणाचा विस्तार वाढवण्यासोबतच त्याचा दर्जा टिकवणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांनी येथे केले.

'सकाळ प्रकाशन'तर्फे लेखक व सहायक शिक्षण संचालक डॉ. गणपती कमळकर लिखित 'विश्वश्रेष्ठ शिक्षण देणारे देश आणि भारत' या पुस्तकाच्या प्रकाशनप्रसंगी ते बोलत होते. त्यांच्याच हस्ते पुस्तकाचे प्रकाशन झाले. ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुशीलकुमार लवटे अध्यक्षस्थानी होते. यावेळी 'ऑनलाईन शिक्षण पद्धती' या पुस्तकाच्या चौथ्या आवृत्तीचेही प्रकाशन झाले. कॉमर्स कॉलेजमधील सभागृहात हा कार्यक्रम झाला.

डॉ. कामत म्हणाले, 'हजार वर्षांपूर्वी नालंदासारख्या विद्यापीठाच्या माध्यमातून भारत हा जगातील सर्वोत्तम शिक्षण देणारा देश होता. चिनी प्रवाशांनीही येथे येऊन ज्ञानार्जन केले. जागतिक पातळीवर स्पर्धा करण्यासाठी श्रमप्रतिष्ठा, शिस्त व स्वावलंबन ही मूल्ये रुजवावी लागतील. 'सिंगापूर संकल्पना समजण्यावर भर देतो, तर जर्मनी डोक्याला ज्ञान आणि हाताला काम देऊन कौशल्याला प्रतिष्ठा मिळवून देतो.'

डॉ. लवटे म्हणाले, 'सध्याच्या शिक्षण व्यवस्थेला आणि शिक्षकांना कुबड्यांची गरज पडत असून, हे पुस्तक वर्तमानाचा खरा आरसा मांडते. शिक्षकाला अध्यापनाचे मूळ काम सोडून सरकार तब्बल ४९ प्रकारची अशैक्षणिक कामे लावत असेल, तर भावी पिढी कशी घडणार? शिक्षणाबाबत अनास्था बाळगणाऱ्या शासनाला देशाचे भविष्य घडवता येत नाही. कुंभमेळ्यासाठी हजारो कोटी खर्च केले जातात; पण शाळांमध्ये शिक्षक आणि शिपायांची पदे रिक्त ठेवली जातात. आज विद्यापीठांमधील अधिविभागांतील पटसंख्या रोडावत असताना दुसरीकडे मार्गदर्शकच पीएच. डी.चे प्रबंध लिहीत असल्यासारखी विदारक स्थिती आहे.'

डॉ. कमळकर यांनी संशोधनात्मक दृष्टिकोनातून पुस्तके लिहिली असल्याचे सांगितले. 'सकाळ'चे संपादक निखिल पंडितराव यांनी प्रास्ताविक केले. आंतरराष्ट्रीय घडामोडींचे अभ्यासक शैलेंद्र देवळाणकर यांनी ऑनलाईन संवाद साधला. याप्रसंगी शिक्षणाधिकारी अशोक घुगे, कौन्सिल ऑफ एज्युकेशनचे सचिव डॉ. विश्वनाथ मगदूम, प्राचार्या डॉ. वर्षा मैंदर्गी, प्राचार्य डॉ. उत्तम पाटील, गीतांजली कमळकर उपस्थित होते.

शिक्षणावर केवळ दोन टक्केच खर्च

■ भारतात २५ कोटी मुले शाळांत, तर ४ कोटी ५० लाख उच्च शिक्षणात आहेत. उच्च शिक्षणात मुलींचे प्रमाण लक्षणीय आहे. फिनलंडसारख्या अवघ्या ५५ लाख लोकसंख्येच्या देशाने शिक्षणात मोठी गुंतवणूक केली आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (एआय) या नव्या युगात आपण शिक्षणावर राष्ट्रीय उत्पन्नाच्या केवळ दोन टक्के खर्च करत आहोत, असे कुलगुरू डॉ. कामत म्हणाले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 2 NOV 2026 सकाळ





कोल्हापूर : पुरुषोत्तम करंडक एकांकिका स्पर्धेत **प्रथम** आलेल्या नागठाणे आदर्श कॉमर्स अँड सायन्स कॉलेज (जि. सातारा) यांच्या **'पैरा'** एकांकिकेच्या संघाला पारितोषिक देताना कुलगुरू डॉ. आर. के. कामत. दुसऱ्या छायाचित्रात द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक स्वीकारताना 'मागचं दार' या एकांकिकेचा संगीत व नाट्यशास्त्र विभाग शिवाजी विद्यापीठाचा संघ.

पुरुषोत्तम करंडक स्पर्धेत 'पैरा'चा डंका

प्राथमिक फेरीत प्रथम : 'मागचं दार' दुसरी, तर 'शाब्बास पठ्ठे' एकांकिका तिसरी

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १ : पुरुषोत्तम करंडक आंतर महाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेत आदर्श कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, नागठाणे (जि. सातारा) यांच्या 'पैरा' या एकांकिकेने प्रथम क्रमांक पटकावला. यांसह या संघाने पुणे येथे होणाऱ्या महाअंतिम फेरीतही प्रवेश केला. संगीत व नाट्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ यांची 'मागचं दार' ही एकांकिका दुसरी आली, तर देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेजची 'शाब्बास पठ्ठे' ही एकांकिका तिसरी आली, तर भारती विद्यापीठ अभियांत्रिकी महाविद्यालयाची 'साठी' ही सर्वोत्कृष्ट प्रायोगिक एकांकिका ठरली. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांच्या हस्ते पारितोषिक वितरण झाले.

महाराष्ट्र कलोपासक, पुणे तर्फे राज्यस्तरीय पुरुषोत्तम करंडक एकांकिका स्पर्धा संगीत व नाट्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ आणि गायन समाज देवल क्लब यांच्या सहकार्याने झाली. स्पर्धेत १६ संघांनी सहभाग घेतला. स्पर्धेचे चंद्रशेखर कुलकर्णी, श्रीनिवास एकसंबेकर, सोनाली मगर यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

यावेळी संगीत व नाट्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. विनोद ठाकूरदेसाई, गायन समाज देवल क्लबचे सुयोग गद्रे, सचिन पुरोहित आणि अनेय साठे उपस्थित होते. राजन ठाकूर यांनी सूत्रसंचालन केले, तर शंकर उनेचा यांनी आभार मानले.

पुढचा कलाकारांपुढे नाट्यकला अधिक उज्ज्वल

कुलगुरू डॉ. कामत म्हणाले, "नाट्यकलेची पुरातन सांगलित लेखली. राजर्षी शाहू महाराजांनी कलाकारांना राजाश्रय दिला. गायन समाज देवल क्लबने संगीत व नाट्यकलांचे शिक्षण देत कलाकार घडवले. अशा सांस्कृतिक परंपरेच्या भागात कलोपासक संस्था पुरुषोत्तम करंडक एकांकिका स्पर्धेद्वारे नाट्यकलेची परंपरा जोमाने पुढे नेत आहे. या स्पर्धेत पुढा कलाकारांचा उत्साही सहभाग भविष्यात नाट्यकलेची परंपरा अधिक उज्ज्वल करण्यास बळ देईल."

अभिनय उत्तेजनार्थ पारितोषिके :

- प्रणाली कदव (पंडिम)
- धनश्री पटकुरे (ओऑसिस)
- हर्षिता पंडपे (आभास)
- प्रणाली पेठकर (चिठ्ठी)
- आविष्कार कांबळे (साडेतीन हातांचा शिरोज)

अन्य वैयक्तिक पारितोषिके अशी

(प्रकार कलाकाराचे नाव, एकांकिकेचे नाव, भूमिका आणि संघाचे नाव)

- अभिनय नैपुण्य - पुरुष : महेश चोगुले - 'शाब्बास पठ्ठे' देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज
- अभिनय नैपुण्य - स्त्री : श्वेता देसाई - 'मागचं दार' - संगीत व नाट्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ
- अभिनय नैपुण्य - स्त्री : श्रद्धा मेटील - 'साठी' - भारती विद्यापीठ अभियांत्रिकी महाविद्यालय
- सर्वोत्कृष्ट लेखक : अजय साठेकर - 'मागचं दार', संगीत व नाट्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ
- सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक : श्रद्धा मेटील, शौनक कुलकर्णी - 'साठी', भारती अभियांत्रिकी महाविद्यालय.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 2 NOV 2026

लोकमत

नागठाणेच्या आर्ट्स, कॉमर्स आणि सायन्स कॉलेजने पटकाविला पुरुषोत्तम करंडक

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : पुरुषोत्तम करंडक यंदा नागठाणे येथील आर्ट्स, कॉमर्स आणि सायन्स कॉलेजने पटकावला. गायन समाज देवल क्लबच्या टेंबे रंगमंदिरात रविवारी कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांच्या हस्ते पारितोषिक वितरण झाले.

कोल्हापूरच्या नाट्यविश्वात महत्त्वाचे स्थान असलेल्या पुरुषोत्तम करंडक अंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेत एकाहून एक सरस संहिता सादर झाल्या. महाराष्ट्रीय कलोपासक, पुणे, गायन समाज देवल क्लब, कोल्हापूर व शिवाजी विद्यापीठ यांच्या सह-आयोजनातून झालेल्या या स्पर्धेत १३ एकांकिका सादर झाल्या. स्पर्धेत प्रथम क्रमांकाचा पुरुषोत्तम करंडक आणि पाच हजारांचे रोख पारितोषिक नागठाणेच्या आर्ट्स, कॉमर्स व सायन्स कॉलेजच्या 'पैरा' एकांकिकेने मिळविले. द्वितीय क्रमांक शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या 'मागचं दार' एकांकिकेला मिळाला. देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्सच्या संघाने 'शाब्बास पठ्ठे'साठी तृतीय क्रमांक पटकावला. विशेष पारितोषिकांत सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार कॉलेजच्या महेश चौगुले यांना 'शाब्बास पठ्ठे'साठी, तर सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार 'मागचं दार' मधील भूमिकेसाठी शिवाजी विद्यापीठाच्या श्वेता देसाई व 'साठी'ला श्रद्धा मेटील यांना मिळाला. भारती विद्यापीठाच्या अभियांत्रिकीला 'साठी'करिता सर्वोत्कृष्ट प्रायोगिकचे पारितोषिक मिळाले. सर्वोत्कृष्ट विद्यार्थी लेखनाचा पुरस्कार 'मागचं दार'साठी अजय सावर्डेकर यांना व सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक पुरस्कार श्रद्धा मेटील यांना दिला. चंद्रशेखर कुलकर्णी, श्रीनिवास एकसंबेकर, सोनाली मगर परीक्षक होते.



देवल क्लब येथे रविवारी नागठाणे येथील आर्ट्स, कॉमर्स व सायन्स कॉलेजच्या संघाने डॉ. राजनीश कामत यांच्या हस्ते पुरुषोत्तम करंडक पुरस्कार स्वीकारला. छाया : प्रफुल्ल सप्रे

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत

02 NOV 2026

आर्टस्, कॉमर्स अँण्ड सायन्स कॉलेज मानकरी

पुरुषोत्तम करंडक : आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धा : संगीत व नाट्यशास्त्र विभागाने मिळवले दुसरे स्थान

| त. भा. प्रतिनिधी



कोल्हापूर : आर्टस्, कॉमर्स अँण्ड सायन्स कॉलेजला प्रथम क्रमांकाचे पुरुतोत्तम करंडक व रोख रकमेचे बक्षीस देताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनिश कामत. डावीकडून सचिन पुरोहित, सोनाली मगर, श्रीनिवास एकसंबेकर, चंद्रशेखर कुलकर्णी, सुबोध गद्रे, विनोद ठाकुर-देसाई, शंकर उनेचा.

कोल्हापूर : महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थीनीमधील कलाकाराला रंगमंच मिळवून देण्यासाठी हक्काने कोल्हापूर विभागाअंतर्गत आयोजित केल्या जाणाऱ्या पुरुषोत्तम करंडक आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेत नागठाणे (जि. सातारा) येथील आर्टस्, कॉमर्स अँण्ड सायन्स कॉलेजने पहिला क्रमांक पटकावला. या कॉलेजने स्पर्धेत 'पैरा' या एकांकिका सादर केली होती. नवऱ्याने सोडलेल्या पत्नीचे जीवन कसे खडतर हे दाखवले. शिवाजी विद्यापीठातील संगीत व नाट्यशास्त्र विभागाने दुसरा क्रमांक मिळवला. या विभागाने स्पर्धेत मागचं दार ही एकांकिका सादर केली होती.

कोल्हापुरातील देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कॉलेजही स्पर्धेत बाजी मारत तिसरा क्रमांक पटकावला. या कॉलेजने 'शाब्बास पठठे !" ही एकांकिका सादर केली. गायन समाज देवल क्लबच्या गोविंदराव टेंबे रंग मंदिरात झालेल्या या एकांकिका स्पर्धेची रविवारी सांगता झाली. शिवाजी विद्यापीठ, गायन समाज देवल क्लब व पुण्यातील महाराष्ट्रीय कलोपासक यांच्या वतीने स्पर्धेचे आयोजन केले होते. स्पर्धेत १६ महाविद्यालयांनी एकांकिका सादर केल्या. या एकांकिकांचे रंगकर्मी सोनाली मगर, श्रीनिवास एकसंबेकर व चंद्रशेखर कुलकर्णी या परीक्षकांनी परीक्षण पारितोषिक वितरण समारंभास यावेळी देवल क्लबचे संचालक सचिन पुरोहित, संचालक सुबोध गद्रे, विनोद ठाकूर-देसाई उपस्थित होते. शंकर उनेचा यांनी आभार मानले.

बक्षिस देऊन गौरव

सर्वोत्कृष्ट प्रायोगिका एकांकिका म्हणून भारती विद्यापीठाच्या अभियांत्रिकी कॉलेज कोल्हापूर-२ ने सादर केलेल्यासाठी एकांकिकेला निवडले. कुलगुरू डॉ. राजनिश कामत यांच्या हस्ते स्पर्धेत पहिला क्रमांक, दुसरा व तिसरा क्रमांक प्राप्त कॉलेजलांना करंडक व रोख रक्कमेचे बक्षीस देऊन गौरवले. भारती विद्यापीठाच्या अभियांत्रिकी कॉलेज कोल्हापूर-२ चाही फिरता करंडक व ५ हजार रुपये देऊन सन्मान केला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 2 NOV 2026

पुढारी

पर्यटनाला चालना देणारा उपक्रम स्तुत्य : कुलगुरू कामत

- शिवाजी विद्यापीठातून बाईक रॅलीस हिरवा झेंडा

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

पर्यटनवाढीला चालना देण्याच्या उद्देशाने 4X4 कोल्हापूर स्पोर्टस् क्लबने आयोजित केलेला उपक्रम स्तुत्य आहे. अशा उपक्रमांमुळे कोल्हापूरच्या पर्यटनाला नवी दिशा मिळेल, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांनी केले.

'रेड मड 4X4 ऑफ-रोड चॅलेंज'च्या वतीने आयोजित 'गगनबावडा बाईक राईड २०२६' रॅलीला शिवाजी विद्यापीठातून हिरवा झेंडा दाखवून रवाना करताना ते बोलत होते. १६ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या नेपाळ बाईक एक्स्पिडिशनची ही ट्रायल राईड आहे. यामध्ये रायडर्सच्या बाईकची क्षमता, रायडिंग कौशल्य, सांघिक समन्वय आणि सहनशक्तीची चाचणी घेतली जाणार आहे.

दसरा चौकात भाजपचे कृष्णराज महाडिक यांनी रॅलीचे स्वागत केले. कोल्हापूर स्पोर्टस् क्लबचे प्रशांत काशीद यांनी पर्यटनवाढीसाठी दरवर्षी अशा रॅलींचे आयोजन करण्याचा मानस व्यक्त केला. यावेळी कर्नल विक्रम नलवडे, कोल्हापूर स्पोर्टस् क्लबचे अध्यक्ष केतन चव्हाण, अश्विन शिंदे, प्रशांत काशीद, डॉ. नचिकेत पाटील आदी उपस्थित होते.

0 2 NOV 2026

तरुण भारत



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात सरदार पटेल आणि इंदिरा गांधी यांच्या प्रतिमांना कुलगुरू डॉ. राजनीश कामत आणि प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला.

सरदार पटेल, इंदिरा गांधी यांना विद्यापीठात अभिवादन

कोल्हापूर : भारताचे लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती आणि माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांचा स्मृतिदिन या निमित्ताने त्यांच्या स्मृतींना शिवाजी विद्यापीठात अभिवादन करण्यात आले. शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये सकाळी सरदार पटेल आणि इंदिरा गांधी यांच्या प्रतिमांना कुलगुरू डॉ. राजनीश कामत आणि प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. तद्नंतर, सर्व उपस्थितांनी एकता व सद्भावना यांची शपथ घेतली. डॉ. प्रमोद कसबे यांनी शपथ प्रदान केली. यावेळी कुलसचिव डॉ.विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन संचालक डॉ. अजितसिंह जाधव, स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजीचे संचालक डॉ. किरण कुमार शर्मा, रिसर्च अँड डेव्हलपमेंट सेलचे समन्वयक डॉ. तुकाराम डोंगळे, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटचे संचालक डॉ. संतोष सुतार, डॉ. प्रमोद पाटील, डॉ. सुर्यबाला सावंत, डॉ. देवश्री पाटील, डॉ. सोमनाथ पवार, डॉ. स्नेहा पाटील, डॉ. योजना पाटील, डॉ. तेजस्विनी भट यांच्यासह विविध अधिविभागांचे शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, सेवक, विद्यार्थी–विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

0 2 NOV 2026
पुण्यनगरी

डिजिटल युगात शिक्षणाच्या नव्या संधी

प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव



ऑनलाईन अभ्यासक्रमांचा दीक्षारंभ सोहळा

कोल्हापूर : प्रतिनिधी

डिजिटल तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शिक्षणाच्या नव्या संधी विद्यार्थ्यांना मिळणार असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी केले. विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या वतीने ऑनलाईन एम.बी.ए., एम. कॉम. आणि एम.एस्सी. (गणित) या अभ्यासक्रमांच्या नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठ अनुदान आयोग मार्गदर्शन तत्त्वानुसार तीन दिवसीय दीक्षारंभ : विद्यार्थी उद्‌बोधन कार्यक्रमात बोलत होत्या.

डॉ. जाधव म्हणाल्या, पारंपरिक वर्गाधारित शिक्षणापासून आधुनिक ऑनलाईन अध्यापन-अध्ययन पद्धतीकडे विद्यार्थ्यांचा कल वाढत आहे. शिक्षण, विद्यार्थ्यांची प्रतिभा, कौशल्य विकास आणि मानवी मूल्ये यांचा सुंदर संगम या उपक्रमातून मिळतोय ही अभिनंदनीय गोष्ट आहे. विद्यार्थ्यांनी स्वयंशिस्त, वेळेचे योग्य नियोजन, सातत्यपूर्ण अभ्यास आणि तंत्रज्ञानाचा जबाबदारीने वापर केला पाहिजे, असेही त्या म्हणाल्या. प्रास्ताविक संचालक डॉ. पी. एस. पाटणकर, सूत्रसंचालन डॉ. नगिना माळी आणि प्रियांका सुर्वे यांनी केले. दयानंद गवाडे यांनी आभार मानले.

दुसऱ्या दिवशी वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाचे प्रमुख डॉ. केदार व्ही. मारुळकर यांनी 'ऑनलाईन शिक्षणाचे चार चतुष्कोन' या विषयावर मार्गदर्शन केले. तिसऱ्या दिवशी बहाई अकादमी, पाचगणीचे वरिष्ठ कार्यक्रम अधिकारी व कार्यक्रम समन्वयक पराग टंडले यांनी 'कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगातील व्यावसायिक उत्कृष्टता, नैतिक विकास आणि मानवी मूल्यांसाठी शिक्षण' या विषयावर व्याख्यान दिले.

प्रियांका सुर्वे यांनी समारोप सत्राचे सूत्रसंचालन केले. नाझिया मुल्लाणी यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
0 2 NOV 2026
तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

डिजिटल युगात शिक्षणाच्या नव्या संधी : डॉ. ज्योती जाधव

प्रतिनिधी, कोल्हापूर

- **दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रात ऑनलाईन अभ्यासक्रमाचा दीक्षारंभ सोहळा**

डिजिटल तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शिक्षणाच्या नव्या संधी विद्यार्थ्यांना मिळणार असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाइन शिक्षण केंद्राच्या वतीने ऑनलाइन एम.बी.ए., एम. कॉम. आणि एम.एस्सी. (गणित) या अभ्यासक्रमांच्या नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठ अनुदान आयोग मार्गदर्शन तत्वानुसार तीन दिवसीय 'दीक्षारंभ विद्यार्थी उद्बोधन कार्यक्रम २०२६२७' आयोजित करण्यात आला. त्यावेळी त्या प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होत्या.

यावेळी डॉ. जाधव म्हणाल्या की, पारंपरिक वर्गाधारित शिक्षणापासून आधुनिक ऑनलाइन अध्यापन – अध्ययन पद्धतीकडे विद्यार्थ्यांचा कल वाढत आहे. शिक्षण, विद्यार्थ्यांची प्रतिभा, कौशल्य विकास आणि मानवी मूल्ये यांचा सुंदर संगम या उपक्रमातून मिळतोय ही अभिनंदनीय गोष्ट आहे. विद्यार्थ्यांनी स्वयंशिस्त, वेळेचे योग्य नियोजन, सातत्यपूर्ण अभ्यास आणि तंत्रज्ञानाचा जबाबदारीने वापर केला पाहिजे. केवळ पदवी संपादन न करता व्यावहारिक ज्ञान, नेतृत्वगुण, संवादकौशल्य आणि व्यावसायिक नैतिकता विकसित करण्यावर भर दिला पाहिजे. आजच्या काळात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार कौशल्याधारित व गुणवत्तापूर्ण शिक्षण महत्वाचे आहे. संचालक प्रा. डॉ. पी. एस. पाटणकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. नगिना माळी आणि श्रीमती प्रियांका सुर्वे यांनी सूत्रसंचालन केले, तर दयानंद गवाडे यांनी आभार मानले.

दुसऱ्या दिवशी वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाचे प्रमुख डॉ. केदार व्ही. मारुळकर यांनी 'ऑनलाइन शिक्षणाचे चार चतुष्कोन' या विषयावर मार्गदर्शन केले. तिसऱ्या दिवशी बहाई अकादमी, पाचगणीचे वरिष्ठ कार्यक्रम अधिकारी व कार्यक्रम समन्वयक श्री. पराग टंडले यांनी 'कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगातील व्यावसायिक उत्कृष्टता, नैतिक विकास आणि मानवी मूल्यांसाठी शिक्षण' या विषयावर प्रेरणादायी व्याख्यान दिले. प्रियांका सुर्वे यांनी समारोप सत्राचे सूत्रसंचालन केले, तर नाझिया मुल्लानी यांनी आभार मानले.

0 2 NOV 2026
जनप्रवास



शिवाजी विद्यापीठात दृष्टीदिव्यांगांसाठी आयोजित विशेष कार्यशाळेचे उद्घाटन करताना कुलसचिव डॉ. विलास शिंदे. सोबत सतीश नवले, डॉ. प्रतिभा देसाई, उदय माने आदी.

दृष्टीहीन महिलांसाठी तंत्रज्ञान' कार्यशाळेला प्रतिसाद

जनप्रवास : कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या 'युजीसी स्कीम फॉर पर्सन्स विथ डिसॅबिलिटीज आणि समावेशी शिक्षण संसाधन केंद्राच्या वतीने "दृष्टीहीन महिलांसाठी तंत्रज्ञान" या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेला मोठा उत्साही प्रतिसाद लाभला.

विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते रोपट्याला पाणी घालून कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. दूरशिक्षण केंद्र संचालक डॉ. प्रतिभा पाटणकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. विलास शिंदे यांनी यावेळी 'दृष्टीदिव्यांग महिलांसाठी विकास धोरण' या विषयावर व्याख्यान दिले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील अनाथ आणि दिव्यांगांसाठी असलेल्या कल्याणकारी तरतुदींचा ऐतिहासिक संदर्भ त्यांनी दिला. संतोष परीट यांनी 'दृष्टीहीन महिलांच्या जीवनात तंत्रज्ञानाचे महत्त्व' या विषयावर विचार मांडले.दुसऱ्या सत्रात नॅबचे उपाध्यक्ष उदय माने यांनी 'दृष्टीहीन महिलांची सुरक्षा व त्यासाठीच्या उपाययोजना' यावर मार्गदर्शन केले. स्कूल ऑफ नॅनोसायन्सचे डॉ. प्रमोद पाटील यांनी 'दैनंदिन जीवनात प्राणायामाचे महत्त्व' आणि डॉ. प्रतिभा देसाई यांनी "स्वयंशिस्त व शी टॉक उपक्रमांतर्गत दृष्टीहीन महिलांशी संवाद' यावर मार्गदर्शन केले. कार्यशाळेस उपस्थित सर्व दृष्टीदिव्यांग महिलांनी विद्यापीठात पी.एम. उषा योजनेअंतर्गत सुरू असलेल्या चॉकलेट प्रकल्पाला भेट दिली. कल्याणी माने यांनी सूत्रसंचालन केले. सतीश नवले यांनी आभार मानले.

0 2 NOV 2026
तरुण भारत

इमराल्ड डेटाबेस कार्यशाळेत ६५ जणांचा सहभाग

कोल्हापूर: शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्रातर्फे आयोजित इमराल्ड डेटाबेस प्रशिक्षण कार्यशाळेत ६५ जणांनी सहभाग घेतला. शुक्रवारी ऑनलाइन झालेल्या या कार्यशाळेत संशोधक, ग्रंथपाल आणि विद्यार्थ्यांना इमराल्ड ई–जर्नल्स प्लॅटफॉर्मच्या वापराबाबत मार्गदर्शन करण्यात आले. नवी दिल्ली येथील वंदना महाजन यांनी संसाधन व्यक्ती म्हणून मार्गदर्शन केले. संशोधनासाठी आवश्यक माहिती शोधणे, ती मिळवणे आणि संदर्भ देण्यासाठी इमराल्ड प्लॅटफॉर्मचा प्रभावी वापर कसा करावा, याची माहिती त्यांनी दिली. कार्यशाळेच्या आयोजनासाठी कुलगुरू डॉ. रजनीश कामत, प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव आणि कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. प्रभारी संचालक डॉ. धनंजय सुतार यांनी प्रास्ताविक केले.

0 2 NOV 2026
तरुण भारत

छत्रपती शाहू इन्स्टिट्यूटच्या महिला महाविद्यालयाचे नामकरण

त. भा. प्रतिनिधी

- 'सुनिता आनंदराव शिंदे महिला महाविद्यालय' असे असणार नवे नाव
- शिवाजी विद्यापीठाची मान्यता

कोल्हापूर : येथील छत्रपती शाहू इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस, एज्युकेशन अँड रिसर्च ट्रस्टअंतर्गत चालविण्यात येणाऱ्या 'कॉलेज ऑफ नॉन-कन्व्हेन्शनल व्होकेशनल कोर्सेस फॉर वुमन" या महाविद्यालयाच्या नावात बदल करण्यास शिवाजी विद्यापीठाने मान्यता दिली आहे. यापुढे हे महाविद्यालय 'श्रीमती सुनिता आनंदाराव शिंदे महिला महाविद्यालय, कोल्हापूर' या नावाने ओळखले जाणार आहे.

याबाबत शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी गुरूवारी यासंदर्भातील अधिकृत पत्र जारी केले आहे. महाविद्यालयाच्या नामांतराबाबत संस्थेने सादर केलेल्या प्रस्तावानुसार विद्यापीठाच्या अधिकार मंडळाने आणि महाराष्ट्र शासनाने निर्धारित केलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहून ही मान्यता देण्यात आली आहे.

यापुढे महाविद्यालयाचा सर्व पत्रव्यवहार नव्या नावानुसार करण्याची दक्षता घेण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. दरम्यान, या नामांतरामुळे महाविद्यालयाच्या पूर्वीच्या शासकीय मान्यतेत कोणताही बदल होणार नाही. तसेच केवळ नाव बदलल्यामुळे शासनावर कोणतेही अतिरिक्त आर्थिक किंवा अन्य दायित्व निर्माण होणार नसल्याचे पत्रात स्पष्ट केले आहे.

0 2 NOV 2026

पुढारी

शिवाजी विद्यापीठात उद्यापासून दोनदिवसीय व्याख्यानमाला

कोल्हापूर : न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांच्या १२५ व्या स्मृतिवर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागातर्फे मंगळवारपासून (दि. ३) 'महादेव गोविंद रानडे : काळ आणि कर्तृत्व' या विषयावर दोनदिवसीय व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. दि. ३ नोव्हेंबर रोजी किशोर बेडकिहाळ, डॉ. नीरज हातेकर, डॉ. भारती पाटील, डॉ. रणधीर शिंदे यांच्यासह विविध मान्यवर रानडे यांच्या सामाजिक, आर्थिक आणि प्रबोधनपर विचारांवर भाष्य करतील. ४ नोव्हेंबर रोजी डॉ. नागोराव कुंभार, डॉ. प्रकाश पवार, डॉ. नीलांबरी जगताप, डॉ. नंदकुमार मोरे आणि डॉ. अशोक चौसाळकर यांची व्याख्याने होतील. व्याख्यानमालेस उपस्थित राहण्याचे आवाहन इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनीश पाटील व कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले आहे.

0 2 NOV 2026

पुण्यनगरी

'देवचंद'च्या दोन वेटलिफ्टर्सची निवड

करड्याळ : कुरुंदवाड येथील हर्क्युलस जिममध्ये झालेल्या आंतरविभागीय वेटलिफ्टिंग स्पर्धेत देवचंद महाविद्यालयाच्या वेदांत घागरे, सोहम राठोड या खेळाडूंनी दोन सुवर्ण आणि एका कास्यपदकाची कमाई केली. त्यांची पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ वेटलिफ्टिंग स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाच्या संघात निवड झाली. गुजरात येथील संकलचंद पटेल विद्यापीठात आयोजित पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत हे दोन्ही खेळाडू सहभागी होत आहेत. त्यांना जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष आशीष शाह, उपाध्यक्षा डॉ. तृप्ती शाह, खजिनदार सुबोध शाह, प्रभारी प्राचार्य प्रो. डॉ. रमेश साळुंखे, आयक्यूएसीप्रमुख डॉ. पी. डी. शिरगावे, जिमखानाप्रमुख डॉ. रवींद्र चव्हाण, जिमखाना कर्मचारी वैभव सोनार, अनंत घोळवे यांचे मार्गदर्शन लाभले.



वेदांत घागरे



सोहम राठोड

0 2 NOV 2026
सकाळ

विशाल बनसोडेची शिवाजी विद्यापीठ संघात निवड


विशाल बनसोडे

गडहिंग्लज : बंगळूर येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रॉसकंट्री स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघातून येथील ओंकार कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचा खेळाडू विशाल बनसोडे याची निवड करण्यात आली. त्याला संस्थाध्यक्ष राजन पेडणेकर, प्राचार्य डॉ. मनोहर पुजारी, प्रकाश कांबळे यांचे प्रोत्साहन, तर शारीरिक शिक्षण संचालक सुरेश धुरे यांचे मार्गदर्शन मिळाले.

0 2 NOV 2026
सकाळ



वीणा गंधवाले



वैष्णवी पाटील

वैष्णवी पाटील, वीणा गंधवाले यांचे ज्यूदो स्पर्धेत यश

सकाळ वृत्तसेवा

कोतोली, ता. १ : कोतोली (ता. पन्हाळा) येथील श्रीपतराव चौगुले कॉलेजच्या विद्यार्थिनी वैष्णवी पाटील व वीणा गंधवाले यांनी शिवाजी विद्यापीठात झालेल्या आंतरविभागीय ज्यूदो स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला.

वैष्णवीने ४८ किलो वजनीगटात तसेच वीणा गंधवाले हिने ५२ किलो वजनीगटात प्रथम क्रमांक मिळवला. त्यामुळे दोघींची गुजरात स्पोर्टस् युनिव्हर्सिटीमध्ये होणाऱ्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाच्या संघात निवड झाली. त्यांना क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक प्रा. संग्रामसिंह मोरे, डॉ. यू. एन. लाड यांचे मार्गदर्शन लाभले.